81

Aarhat Publication & Aarhat Journal's

# ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

**Peer Reviewed Interdisciplinary Research Journal**

**ISSN- 2277-8721**

Online and Print Journal

**Impact Factor: 5.20 (EduIndex)**

**UGC Approved Journal No - 48833**

**10th March, 2018**

**Vol VII Issues No X**

**Chief Editor**

Ubale Amol Baban

**Chief Editor**

Prin. Dr. Purandhar Dhanpal Nare

## INDEX


| Sr.No. | Author Name | Title | Page No |
|---|---|---|---|
| 1 | डॉ.भगवान जाधव | उच्च्च शिक्षा में हिंदी का पाठ्यक्रम:एक अनुशीलन | 1 |
| 2 | डॉ.एम.आर.मुंडकर | देवेश ठाकुर के उपन्यासों में चित्रित उच्च शिक्षा व्यवस्था का यथार्थ ('गुरुकुल' और 'शिखर पुरुष' उपन्यासों के सन्दर्भ में ) | 5 |
| 3 | डॉ.एकनाथ पाटील | मराठी के बारोमास उपन्यास में उच्च शिक्षित युवाओं की भयावहता | 9 |
| 4 | डॉ. प्रकाश मुंज | बीसवी सदी के अंतिम दशक की हिंदी कहानी में उच्च शिक्षा | 14 |
| 5 | प्रा.संतोष साळुंखे | 'आठवे दशक के उपन्यासों में चित्रित उच्च शिक्षा व्यवस्था का वास्तव'('चक्रव्यूह' और 'सुनी घाटी का सूरज' के विशेष संदर्भ में) | 21 |
| 6 | डॉ.सहदेव वर्षाराणी निवृत्तीराव | भूमण्डलीकरण और आज की कविता | 24 |
| 7 | डॉ आर. बी .भूयेकर | बीसवी सदी के अंतिम दशक के उपन्यासों में उच्च शिक्षित बेरोजगार युवा | 29 |
| 8 | अतुल आनंदराव देसाई | महाराष्ट्रातील उच्च शिक्षण आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ | 33 |
| 9 | डॉ.वृषाली विकास मिणचेकर | 'विजन'उपन्यास में उच्चशिक्षित स्त्री की स्थिति | 38 |
| 10 | प्रा.पटेल एफ.एन | उच्चशिक्षण आणि मुस्लीम समाज | 42 |
| 11 | डॉ.दीपक कांबळे व डॉ.अरुण जाधव | उच्च शिक्षणासमोरील आव्हान | 45 |
| 12 | डॉ. एस.एम.गावडे | भारतातील उच्च शिक्षणातील समस्या | 48 |
| 13 | Dr. Chetna P.Sonkamble Mr.Vijaykumar Mutnale | Emerging Issues And Challenges In Higher Education | 53 |
| 14 | रीना कांबळे | उच्च शिक्षणातील समाजशास्त्रीय संकल्पनाच्या अभ्यासाची गरज :एक चिकीस्ता | 55 |
| 15 | प्रा.वनिता शिंदे | उच्च शिक्षणातील मराठी भाषेचे महत्व | 59 |
| 16 | प्रा.संजय पाटील | हिंदी भाषा और साहित्य के संदर्भ में | 66 |

# भारतातील उच्च शिक्षणातील समस्या

**प्रा.डॉ. एस.एम.गावडे**

*सहाय्यक प्राद्यापक, चंद्राबाई- शांताप्पा शेडूरे कॉलेज, हुपरी.*

**❖ प्रस्तावना :-**

शिक्षण ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे या प्रक्रियेतून व्यक्तीच्या वर्तनात बदल घडवण्यास मदत होते. कोणत्याही समाजव्यवस्थेचे महत्वाचे अंग म्हणून शिक्षण व्यवस्थेकडे पाहिले जाते. उच्च शिक्षण ही तर अत्यंत महत्वपूर्ण व्यवस्था असते. या व्यवस्थेमध्ये अनेक वेळेला काही समस्या निर्माण होतात व त्याचे परिणाम सर्व समाजाला भोगावे लागतात. या उच्च शिक्षणाविषयी महात्मा गांधीजीचे मत असे होते की, ङ्केवळ साक्षरता म्हणजे उच्च शिक्षण नव्हे शिक्षणाचा प्रारंभदेखील नव्हे तर आत्मा आणि मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती हेच खरे शिक्षणाचे ध्येय आहे.ङ्क स्वामी विवेकानंदाच्या मते, ङ्कशिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा अविष्कार होय. संपूर्ण माणसाचा विकास करणे, इच्छाशक्तीचा विकास करणे, तिचे नियंत्रण करून आत्मविकासाच्या कामी तिचा विनियोग करण्याचे सामर्थ्य म्हणजे उच्च शिक्षण होय.ङ्क डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर मानवी जीवनामधील शिक्षण आणि उच्चशिक्षण किती महत्वाचे आहे हे काही ओळीत स्पष्ट केले आहे. ते म्हणतात की, ङ्कउच्च शिक्षण म्हणजे समाजिक क्रांतीचे एक अत्यंत प्रभावी साधन आहे. उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस किंवा व्यक्ती हतबल होऊन अलपायुषी होतो, पण शिक्षणापासून व्यक्ती वंचीत राहिल्यास जिवंतपणीच तो दुसऱ्याचा गुलाम बनतो. सामाजिक गतिशीलता, विचारांचे परिवर्तन, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडवून आणण्यासाठी उच्च शिक्षणाची मदत होते. उच्च शिक्षण हे तर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक परिवर्तन घडवून आणणारे महत्वाचे साधन आहे.ङ्क

वरील विविध विचारवंताच्या मतावरून शिक्षण व उच्चशिक्षणाचे महत्व लक्षात येते.

प्रस्तुत शोधनिबंध हा द्वितीयक तथ्यांच्या संकलनावर आधारित असून या शोधनिबंधासाठी विविध पुस्तके, मासिके व इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतला आहे.

भारतामध्ये स्वांतंत्र्योत्तर काळखंडामध्ये शिक्षण पध्दतीमध्ये अनेक व्यापक व मूलभूत स्वरूपात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न झाला. या सर्वाचा शिक्षणव्यवस्थेवर आणि एकूणच समाजव्यवस्थेवर दुरगामी परिणाम काय झाले? व काय होत आहेत याचा अगदी थोडक्यात अभ्यास करण्याचा प्रयत्न येथे संशोधकाने केलेला आहे.

**❖ स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये स्थापन झालेले विविध शिक्षण आयोग व शासनाची शैक्षणिक धोरणे -**

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात तसेच स्वातंत्र्यानंतरही शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी व शिक्षण व्यवस्थे संबधी सुधारणा सुचविण्यासाठी अनेक समित्या व आयोग नेमले गेले. त्या आयोगापैकी काही ठळक आयोग :- भारतीय शिक्षण आयोग (1882),भारतीय विद्यापीठ आयोग (1902), कलकत्ता विद्यापीठ आयोग (1917), विद्यापीठ शिक्षण आयोग (1948), मुदलियार आयोग (1952), भारतीय शिक्षण आयोग (1964-66) आणि राष्ट्रीय शिक्षक आयोग (1985) हे आयोग होत. यापैकी स्वातंत्र्यानंतर स्थापन केलेल्या आयोगाबाबत थोडक्यात माहीती घेवू.

**1) विद्यापीठ शिक्षण आयोग (1948) -**

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णा यांच्या अध्यक्षतेखाली 1948 मध्ये एक आयोग नेमण्यात आला. या आयोगाने आपला अहवाळ 1949 मध्ये सादर केला. भारतातील उच्च शिक्षणाला दिशा देण्याचे काम या आयोगाने केले.

**आयोगाच्या शिफारशी-**

- विद्यापीठीय प्रवेश घेण्या आगोदर 12 वर्षाचा शिक्षणाचा काळ असावा.

•विद्यापीठाची स्नातक पदवी ही प्रशासकीय सेवाकरिता बंधनकारक नसावी.

•विद्यापीठामध्ये कमीतकमी 180 दिवस शिकविण्याचे कार्य चालावे, ते तीन सत्रात विभागले जावे.

•उच्च शिक्षणाचा उद्देश त्रिसत्रीय असावा.

•सर्वच विद्यापीठाचा स्तर समान पण उच्च ठेवण्यात यावा.

•शिक्षणाला समवर्तीसुचित स्थान द्यावे.

•पदवीपर्यंत विद्यार्थी उपस्थिती आवश्यक तर पदव्युतर शिक्षणात उपस्थिती ऐच्छिक असावी.

•शिक्षकांच्या प्रगतीतील प्राद्यापक, प्रप्राठक,अधिव्याख्यात व निर्देशक असे चार ट प्पे असवेत.

•बहिस्थ परीसांना परवानगी द्यावी.

•संशोधन संसाधनांची उपलब्धता वाढवावी.

•शिक्षकांच्या प्राशिक्षणा संदर्भात योग्य कार्यक्रम राबवावा.

•शिक्षकांचे वेतन वाढवून या क्षेत्राकडे वळण्यासाठी लोकांना प्रोत्साहन द्यावे.

ह्या व या सारख्या अनेक महत्वाच्या शिफारशी या आयोगाने केल्या. स्वातंत्र्यानंतरच्या शैक्षणिक वाटचालीत या आयोगाचा वाटा उल्लेखनीय आहे.

1950 साली या आयोगाच्या प्रमुख शिफारशींना मान्यता देण्यात आली.

उदा. 1) 1956 साली विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना.

2) NCC व NSS ची सुरवात इ.

**2. माध्यमिक शिक्षण आयोग (1952-53)**

राधाकृष्णन आयोगाने विद्यापीठ पातळीवरील शिक्षणात सुधारणा करावयाची असेल तर त्यासाठी माध्यमिक शिक्षणाची पुर्णरचना व्हावयास हवी अशी सुचना केली होती त्यामुळे केंद्रशासनाने डॉ. लक्षमणदवारी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली 1952 मध्ये माध्यमिक शिक्षणाचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी या आयोगाची स्थापना केली. या आयोगाने आपला अहवाल 1953 मध्ये सादर केला. त्यामध्ये खालील शिफारशी करण्यात आल्या.

**शिफारशी :-**

•माध्यमिक शिक्षण सात वर्षाचे असावे. हे शिक्षण वयाच्या अकरा ते सतरा वर्षाच्या दरम्यान असावे कनिष्ठ माध्यमिक स्तर हा तीन वर्षाचा तर उच्च माध्यमिक स्तर चार वर्षाचा असावा.

•बहुउद्देशीय शाळांची स्थापना करावी.

•सार्वजनिक शाळा स्थापन कराव्यात.

•शिक्षणाचे माध्याम हे मातृभाषाच असावे व किमान दोन भाषा शिकविल्या जाव्यात.

**3) भारतीय शिक्षण आयोग (1964-66)**

राधाकृष्णन आयोग व मुदलियार आयोग असे महत्वापूर्ण आयोग स्थापून देखील भारतात शिक्षणासंबधी सर्वकंष विचार करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे डॉ.डी.एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय शिक्षण आयोग स्थापन करण्यात आला. शिक्षणाचे क्षेत्र व्यापक असल्याने या आयोगाने बारा अभ्यासगट आणि सात कार्यगट निश्चित केले या आयोगाने आपल्या अहवालास शिक्षण आणि राष्ट्रीय विकास असे शिर्षक दिले आयोगाने आपला अहवाल 1. सामान्य समस्या 2. विविध स्तरांवरील व विविध क्षेत्रातील शिक्षण 3. अंमलबजावणी व 4. पुरवणी कागदीपत्रे आशा चार विभागात सादर केला.

कोठारी आयोगाला भारतीय शिक्षण व्यवस्थेमधील क्रांती असे म्हटले जाते या आयोगाच्या अहवालवर देशभर चर्चा घडून आली.

### 4) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :-

कोठारी आयोगाच्या शिफारसीनुसारच भारताचे पहिले शैक्षणिक धोरण 1968 साली प्रसिध्द करण्यात आले. त्यानंतर वेळोवेळी बदलत्या परिस्थीतीनुसार 1985, 1992, 2001 साली राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे प्रसिध्द करण्यात आली.

### ❖उच्चशिक्षणातील समस्या

शिक्षण हे एक समाज बदलाचे प्रभावी साधन आहे. महात्मा गांधीजींना भारतात मूलभूत शिक्षण-व्यवस्थेमार्फत मु क क्र ांती घडवून आणावयाची होती. जे.एस. ब्रूबॅचर यांनी तर सामाजिक बदलाच्या प्रक्रि येत शिक्षणाच्या भूमिकेविषयी मत नोंदविताना असे म्हटले आहे की, ङ्कार्यकारण भावाचा दिवा जर पेटविला नाही किंवा जर प्रकाश नसेल तर फक्त कष्टच करावे लागतील. जेव्हा बुध्दिवादी प्रक्रिया दूर ठेवली जाईल तेव्हा तलवारी आणि बंदुकी सामाजिक,मध्यस्थाची भूमिका वठवतील अशी शक्यता आहे. मतपत्रिकेचे स्थान बंदुकीच्या गोळ्या घेतील. आपल्या बैद्दिक ऱ्हासाची आणि नैतिक दिवाळखोरीची ही कबुलीच देण्यासारखे नाही का? त्यासाठी आपण केवढी मोठी किंमत मोजनार आहोत?ङ्ख

तेंव्हा सामाजातील प्रत्येक घटकापर्यंत हे सकस शिक्षण पोहचावे व समाज शैक्षणिकदृष्ट्या समृध्द बनावा म्हणून अनेक आयोग नेमले, अनेक शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या असल्या तरी अजूनही उच्च शिक्षणामध्ये प्रामुख्याने खालील समस्या असल्याचे दिसून येते.

### 1) शिक्षणाचे झालेले खासगीकरण -

उच्च शिक्षणाच्या खासगीकरणामुळे आज सर्व प्रकारच्या किफायतशीर व्यवसाय शिक्षण, मोठ्या उद्योगांना गरजेचे असलेले संशोधन, वित्तसंस्था, व्यापार व उद्योगांचे व्यवस्थापन, डिझायनिंग, फिल्मेकिंग या सारख्या क्षेत्रातील उच्च शिक्षण घेण्यासाठी खूप पैसे मोजावे लागतात. या नवीन शैक्षणिक धोरणाचा भांडवलदार आणि व्यापारी वर्गाला फायदा होत आहे. पण हे उच्च शिक्षण प्रचंड महागल्यामुळे समाजाच्या उच्च अर्थिक स्तरातील विद्यार्थ्यांची या प्रतिष्ठेच्या शिक्षणावर मक्तेदारी तयार होत आहे. आणि बहुतांशी निम्न स्तरातील विद्यार्थी ह्या उच्च शिक्षणापासून वंचित राहू लागले आहेत. त्यामुळे त्यांना कमी पगाराची नोकरी वा रोजगाराचा आधार घ्यावा लागतो. परिणामी त्यांचे वार्षिक उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते.

### 2. उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे संख्यात्मक व गुणात्मक प्रमाण कमी

डॉ.शैलेंद्र देवळाणकर यांनी 'भारतातील उच्च शिक्षणाची दुरावस्था' या लेखात भारतातील उच्च उच्च शिक्षण घेणाऱ्यांनी संख्या किती की आहे हे सांगत असताना ते लिहतात की, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात भारताचे सकल नोंदणीचे प्रमाण केवळ 17 % एवढेच आहे. विकासित राष्ट्रे सोडाच पण विकासनिशील राष्ट्रांच्या तुलनेतदेखील हे प्रमाण अतिशय कमी आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या महिलांच्याबद्दल ते म्हणतात की, भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 50% महिला आहेत पण उच्च शिक्षणातील त्यांच्या नोंदणीचे प्रमाण केवळ 16.50% एवढे कमी आहे तसेच भारतातील समाजिकदृष्ट्या वंचित वर्ग असणाऱ्या अल्पसंख्याकाचेही उच्च शिक्षणातील प्रमाण कमीच आहे.

भारतातील उच्च शिक्षणाचा गुणात्मकदृष्ट्या अभ्यास केला असता अभ्यासक्रम संशोधन, मार्गदर्शन आणि शिक्षण या सर्वाचाच दर्जा कमालीचा खालावलेला आहे. याची साक्ष खासगी संस्थेकडून झालेल्या एका सर्वेक्षणानुसार मिळाली. या सस्थेकडून जागतील सर्वोत्म शिक्षण संस्थाची यादी बनवण्यात आली. या यादीत पहिल्या दोनशे शैक्षणिक संस्थामध्ये एक ही भारतीय संस्थेचा समावेश नसल्याचे आढळून आले.

संदर्भ सूची :-

1. चौधरी संदीप, 2015. रॅगिंग : उच्च शिक्षणातील अमानुषता, समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष 32 वे अंक 19 वा पृष्ठ 37 व 38.
2. राठोड शेषराव, 2015. भारतातील शिक्षणाचे खासगीकरण आणि दारिद्रय, समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष 32 वे अंक 19 वा पृष्ठ 41 व 42.
3. घोडके अमोल लक्ष्मण, 2013, भारतातील मानव संसाधन विकास, महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह भाग 1. पृष्ठ 87,99 ते 107.
4. आगलावे, चौधरी व बोरकर (अतिथी संपादक), 2016, समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष 32 वे अंक 20 वा.
5. कृष्णकुमार, भाषांतर गणेश विसपुते, 2007, शासन, समाज आणि शिक्षण.